नियमित दिवाणी दावा क्र. १६८/२०२२
तानाजी पिसाळ वगैरे विरुध्द विशाखा खंडागळे वगैरे
CNR:MHSN14-001075-2022

## नि.क्र. ४२ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादी नं. २ व ३ यांनी प्रतिदाव्यातील वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. मूळ वादीने निरंतर व मॅण्डेटरी मनाईसाठी तसेच वाटपासाठी मूळ दावा दाखल केलेला आहे. वादीच्या दाव्यास व ताकीद अर्जास प्रतिदाव्यातील वादींनी कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे मूळ दाव्याविरुध्द प्रतिदावा देखील दाखल केलेला आहे. सदर कामातील प्रतिदाव्यातील वादी नं. १ हे १ नोव्हेंबर २०२४ रोजी मयत असून सदर प्रतिदाव्यातील वादीचे सरळ कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेणे न्यायासाठी अत्यंत आवश्यक आहे.

२. प्रतिदाव्यातील वादी नं. १ ची वारस मुले ही प्रतिदाव्यातील वादी नं. २ व ३ हे पूर्वीपासून सदरकामी सामील आहेत. प्रतिदाव्यातील वादी नं. १ ची पत्नी व मुलगी हे प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे सरळ व कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. तथापी, प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे सदर वारस हे नाशिक येथे कायमस्वरुपी राहणेस असून प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे वारस म्हणून सामील होणेस तयार नसल्यामुळे त्यांना प्रतिदाव्यातील प्रतिवादी नं. २अ व २ब म्हणून सामील करुन खालीलप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अपिलाच्याकामी वारसांना रेकॉर्डवर घेणेत आलेले आहे.

२. श्री. सदाशिव दौलु पिसाळ ( मयत वारस )

२अ. श्रीमती. हिराबाई सदाशिव पिसाळ,
वय– ७०, धंदा–घरकाम,

२ब. सौ. शोभा दिलीप कदाम,
वय–४६, धंदा– घरकाम,

रा. मिशन कपौंड, येरुसालेम नगर,
शरणपुर, कॅनडा कॉर्नर रोड, नाशिक–२

३. वर नमूद केल्याप्रमाणे कै. सदाशिव दौलू पिसाळ यांचे सरळ कायदेशीर वारस होते व आहेत. वरीलपैकी '२अ' ही पत्नी व '२ब' ही विवाहीत मुलगी आहे. तथापी, प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे सदर वारस हे नाशिक येथे कायमस्वरुपी राहणेस असून सदरकामी प्रतिदाव्यातील वादी म्हणून सामील होणेस तयार नसल्यामुळे प्रतिदाव्यातील वादी नं. १ ला प्रतिदाव्यातील प्रतिवादी नं. २ म्हणून सामील करुन त्यांचे वर नमूद केल्याप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेणे न्यायासाठी आवश्यक आहे. सबब, कै. सदाशिव दौलु पिसाळ यांचे वर नमूद सरळ कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जास नि.क्र. ४० अर्जाचे पाठीमागेच प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी म्हणणे देऊन असे कथन केले की, प्रतिदाव्यातील वादी यांचा सदरचा अर्ज व त्यातील संपूर्ण मजकूर हा खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर असून प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादी यांनी मयत वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस जाणीवपूर्वक व मुद्दामहून सुमारे सात महिन्यांचा विलंब केलेला आहे. त्यासाठी त्यांनी कोणतेही संयुक्तिक कारण अर्जात नमूद केलेले नाही. अर्जात नमूद कारणे ही खोटी व लबाडीची आहेत. वस्तुतः अर्जात विलंबाबातचे कोणतेही कारण नमूद नाही. विलंब सात महिन्यापेक्षा जास्त कालावधीचा असून देखील जाणीवपूर्वक पाच ते सहा महिन्यांचा विलंब अंदाजाने माफ करुन मागितला आहे. ही पूर्णपणे चुकीची व बेकायदेशीर बाब असून सदर प्रतिवादी यांना केव्हाही कबुल नव्हते व नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा तसेच जाणीवपूर्वक विलंब केल्यामुळे प्रतिदावेतील वादी यांना हेवी कॉस्ट करण्यात यावी असे कथन केले आहे.

५. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. मूळ दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द, वाटप व निरंतर मनाईचा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल केला आहे. प्रतिदाव्यातील वादी यांनी नजरचुकीने व अनावधनाने

वादी नं. १ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाहीत असे कथन केले. त्यामुळे त्यांना अर्ज देण्यासाठी विलंब झाल्याचे दिसते. मात्र, दावा वाटप व निरंतर मनाई करीता असल्यामुळे व प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल केला असल्यामुळे मयताचे वारसांचा देखील दावा मिळकतीमध्ये हक्क, हितसंबंध आहे. दावा व प्रतिदावा गुणदोषांवर चालण्याकरिता प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. मात्र, ते वारस म्हणून सामील होण्यास तयार नसल्यामुळे त्यांना प्रतिवादी नं. २अ व २ब म्हणून सामील केलेस कोणाचेही नुकसान होणार नाही. त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळणार आहे. प्रतिदाव्यातील वादींना प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता झालेल्या विलंबाची भरपाई म्हणून त्यांनी प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांना र.रु. २००/- कॉस्ट देऊन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

अर्ज नि.क्र. ४२ प्रतिदाव्यातील वादी नं. २ व ३ यांनी प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांना र.रु. २००/- कॉस्ट देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतो.

DESAI VINAYA ATMARAM
Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2026.02.26 16:50:57 +0530

शिराळा ( व्ही. ए. देसाई )

दिनांक २५/०२/२०२६ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, शिराळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. S. Gondkar |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 25/02/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 26/02/2026 |
| Order uploaded on | : | 26/02/2026 |